# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## <u>दिनांक 28.02.2017 (का.प.क्र.-13) रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>

मंगळवार दिनांक 28 फेब्रुवारी 2017 (का.प.क्र .13) रोजी मा.सभापती श्री.मोहन मेघावाले यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.55 वाजता सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.रविंद्र निकम, उपआयुक्त (प्र.), नगरसचिव श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1. | स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप |
| 2. | स.स.श्री.नितीन रमन चित्ते |
| 3. | स.स.श्री.सिताराम इसराम सुरे |
| 4. | स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| 5. | स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे |
| 6. | स.स.श्री.विकास प्रकाश एडके |
| 7. | स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| 8. | स.स.श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड |
| 9. | स.स.श्रीमती शेख समीना इलियास |
| 10. | स.स.श्री.अजिम अहेमद रफिक |
| 11. | स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| 12. | स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| 13. | स.स.श्रीमती मनिषा बाळासाहेब मुंडे |
| 14. | स.स.श्री.सोहेल शकील शेख |

**<u>विषय क्र. 130 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, क्रांतीचौक येथील झाशीची राणी उद्यानात 200 फुट उंचीचा ध्वजस्तंभ उभारणे परीसरात मनपा कर्मचाऱ्यांची 9.35 मी. x 4.10 मी आकाराची तीन खोल्या असलेली दोन निवासस्थाने असून सदरील निवासस्थाने अंदाजे 25 ते 30 वर्षापूर्वी बांधण्यात आलेली आहे. सदर निवासस्थानामुळे ध्वजस्तंभ उभारण्यात येणाऱ्या परीसरात अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे बांधकामे निष्काषीत करणे आवश्यक आहे. तसेच बांधकाम निवासस्थाने निष्काषीत करण्यासाठी रक्कम रू.1.25 लक्ष खर्च अपेक्षित आहे. सदरील प्रस्तावास मा.आयुक्त महोदय यांनी प्रशासकीय मान्यता देऊन मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत शिफारस केली आहे.

करीता उपरोक्त नमुद प्रस्तावित निवासस्थाने निष्काषीत करणेच्या व अपेक्षित खर्चाचा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

श्री.गजानन मनगटे :सदरील काम कोणत्या स्टेजला आहे. उद्‌घाटन केव्हा होणार आहे. याबाबतची माहीती देण्यात यावी.

मा.सभापती :माहीती देण्यात यावी.

कार्यकारी अभियंता(श्री.सिकंदर अली):खाजगी संस्थेमार्फत काम चालु आहे. मार्चपर्यंत काम पुर्ण होण्याची शक्यता आहे.

श्री.विकास एडके :उद्यानात 200 फुट उंचीचा ध्वजस्तंभ उभारण्यासाठी aviation ची परवानगी घेतलेली आहे का?

कार्यकारी अभियंता (श्री.सिकंदर अली):परवानगी घेणे आवश्यक आहे. खाजगी संस्था हे काम करीत आहे. ते पाठपुरावा करीत आहे.

श्री.विकास एडके :200 फुटाचा स्तंभ उभारलेला आहे. एअरक्राफ्टला गाईड करण्यासाठी लाईट असतो तो लावण्यात आलेला आहे परंतु विद्युत जोडणी करण्यात आलेली नाही. भविष्यात किंवा आजही त्या ठिकाणी अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब गांभिर्याने घेतली पाहीजे. Aviationची परवानगी घेणे आवश्यक आहे. माहीती देण्यात यावी.

मा.सभापती :सदरील काम केव्हा पुर्ण होणार आहे.

कार्यकारी अभियंता (श्री.सिकंदर अली):खाजगी संस्थेमार्फत काम करण्यात येत आहे. खाजगी संस्थेची जबाबदारी आहे.

श्री.विकास एडके :महानगरपालिकेची काही जबाबदारी नाही का? काही अपघात झाल्यास त्याची जबाबदारी खाजगी संस्थेची आहे की, महानगरपालिकेची आहे?

कार्यकारी अभियंता (श्री.सिकंदर अली):एनओसी घेण्याची जबाबदारी खाजगी संस्थेची आहे. पाठपुरावा चालू आहे.

श्री.कैलास गायकवाड :करारनामा झाला असेल? त्यामध्ये नमूद केलेले असेल की, किती कालावधीत काम करायचे.

कार्यकारी अभियंता (श्री.सिकंदर अली):खाजगी संस्थेची जबाबदारी आहे. एनओसी घेण्याबाबतची कार्यवाही खाजगी संस्था करीत आहे. ध्वजस्तंभ उभारणे परीसरात मनपा कर्मचाऱ्यांची तीन खोल्या असलेली दोन निवास्थाने निष्काषीत करणे संदर्भांत प्रस्ताव सादर केलेला आहे.

श्री.विकास एडके :महानगरपालिकेची जागा आहे. जबाबदारी महानगरपालिकेची आहे.

कार्यकारी अभियंता (श्री.सिकंदर अली):जागा महानगरपालिकेची आहे.

मा.सभापती :जागा महानगरपालिकेची आहे. महानगरपालिकेची जबाबदारी आहे. एनओसी संदर्भांत संबधीत विभागाशी संपर्क साधून पाठपुरावा करणे या संदर्भांत माहीती घेणे हे महानगरपालिकेचे काम आहे.

कार्यकारी अभियंता (श्री.सिकंदर अली):याबाबत माहीती घेण्यात येईल.

श्री.अजिम अ. रफीक :अटीमध्ये एनओसी संदर्भांत नमूद केलेले असेल. संबधीत विभागाने 200 फुट उभारण्यास मनाई केल्यावर त्यावेळेस कोणता निर्णय प्रशासन घेईल.

मा.सभापती :स.सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यानुसार एनओसी संदर्भांत काही प्रश्न उद्‌भवल्यास काम पुर्ण होण्यास विलंब होईल.

श्री.गजानन मनगटे :सदरचा विषय हा शहराची शान वाढविणारा विषय आहे. आपल्या कार्यकाळामध्ये हे काम होणे आवश्यक आहे.

मा.सभापती :स.सदस्य यांनी केलेल्या चर्चेनुसार सदरील काम लवकरात लवकर व्हायला पाहीजे. एनओसीमुळे कामास विलंब होणार नाही याची तपासणी करावी. याबाबतची माहीती येणाऱ्या बैठकीत देण्यात यावी. भविष्यात काही समस्या होउ नये. विषयास मंजूरी देण्यात येते. विषय क्रमांक 142 पर्यंत सर्व विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, क्रांतीचौक येथील झाशीची राणी उद्यानात 200 फुट उंचीचा ध्वजस्तंभ उभारणे करीता परीसरात असलेली मनपा कर्मचाऱ्यांची 9.35 मी. x 4.10 मी आकाराच्या तीन खोल्यांची दोन बांधकाम निवासस्थाने निष्काषीत करण्यास व यासाठी लागणाऱ्या रक्कम रू.1.25 लक्षच्या अपेक्षित खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 131 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.27 मधील मुख्य रस्त्यावर ट्रिमिक्स कॉंक्रीटींग करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन 2014-15 च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.29,93,816/- चे तयार करण्यात आले आहे. प्रस्तावीत कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन 2016-17 च्या अर्थसंकल्पातील मा.स्थायी समितीने शिफारस केलेले कामे अंतर्गत नविन कॉंक्रीट रस्ते पान क्रं.20 अनु.क्रं.18 वर 30.00 लक्ष तरतुद उपलब्ध आहे. प्रस्तावीत अंदाजपत्रकात रस्त्यास, M-10 व M-20 (Trimix concrete) इत्यादी बार्बीचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करणे बाबत शिफारस आहे.

करीता प्रस्तावित कामाचे रक्कम रू.29,93,816/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.27 मधील मुख्य रस्त्यावर ट्रिमिक्स कॉंक्रीटींग करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.29,93,816/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 132 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.66, कैलासनगर अंतर्गत एकनाथ हौसींग सोसायटी येथील अंतर्गत रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2015-16 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.29,98,458/- चे तयार करण्यात आले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च मा.महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामे या लेखाशिर्षा अंतर्गत महानगरपालिकेच्या सन 2016-2017 च्या अर्थसंकल्प पुस्तिकेतील पान क्र.ई-58 वरील अ.क्र.08 मधील उपलब्ध रक्कम रू.1500.00 लक्ष तरतुदीमधुन करण्यात येणार आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांनी प्रशासकीय मान्यता देऊन मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत शिफारस केली आहे.

करीता उपरोक्त नमुद प्रस्तावित कामाच्या अंदाजपत्रक रक्कम रू.29,98,458/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.66, कैलासनगर अंतर्गत एकनाथ हौसींग सोसायटी येथील अंतर्गत रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.29,98,458/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 133 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.10 रोजेबाग येथील सिध्दार्थनगर मधील वेगवेगळ्या ठिकाणाची गटार बांधणे व दुरूस्ती करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.29,98,756.88/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुची 2015-16 नुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च प्रस्तावित 2016-17 शहरी भागात खुल्या गटारी बांधणे या अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.29,98,756.88/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.10 रोजेबाग येथील सिध्दार्थनगर मधील वेगवेगळ्या ठिकाणाची गटार बांधणे व दुरूस्ती करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.29,98,756.88/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 134 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.104, बनेवाडी अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2015-16 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.27,97,445/- चे तयार करण्यात आले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च प्रो-पुअर बजेट या लेखाशिर्षा अंतर्गत महानगरपालिकेच्या सन 2016-2017 च्या अर्थसंकल्प पुस्तिकेतील पान क्र.-नविन कामे पान क्र.09 अ.क्र.02 वरील उपलब्ध रक्कम रू.28.00 लक्ष तरतुदीमधुन करण्यात येणार आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांनी प्रशासकीय मान्यता देऊन मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत शिफारस केली आहे.

करीता उपरोक्त नमुद प्रस्तावित कामाच्या अंदाजपत्रक रक्कम रू.27,97,445/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.104, बनेवाडी अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.27,97,445/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 135 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.07 मयुरपार्क येथे विविध 5 ठिकाणी अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीटींग (ट्रिमिक्स) करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.44,99,952/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुची 2015-16 नुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च प्रस्तावित 2016-17 रेखाकंनातील नवीन कॉंक्रीट रस्ते या अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.44,99,952/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.07 मयुरपार्क येथे विविध 5 ठिकाणी अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीटींग (ट्रिमिक्स) करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.44,99,952/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 136 :**

कार्यकारी अभियंता (झोन क्र.4/5/6/7 व 9) यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.63 अविष्कार कॉलनी अंतर्गत चिश्तिया कॉलनी येथील श्री.मुसा पटेल यांचे घरापासुन ते कादीरभाई यांच्या घरापर्यंत व तालीब भाई यांचे घरापासून ते भाग्यश्री भोजनालया पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीट करणे, या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-16 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.27,48,790/- चे तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च मनपा अर्थसंकल्प सन 2016-17 मधील नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षा मधुन करण्यात येणार आहे. सदर अंदाजपत्रकास दिनांक 31/12/2016 रोजी मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे.

तरी वार्ड क्र.63 अविष्कार कॉलनी अंतर्गत चिश्तिया कॉलनी येथील श्री.मुसा पटेल यांचे घरापासून ते कादीरभाई यांच्या घरापर्यंत व तालीब भाई यांचे घरापासून ते भाग्यश्री भोजनालयापर्यंत रस्त्याचे कॉंक्रीट करणे र.रू.27,48,790/- चे अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.63 अविष्कार कॉलनी अंतर्गत चिश्तिया कॉलनी येथील श्री.मुसा पटेल यांचे घरापासुन ते कादीरभाई यांच्या घरापर्यंत व तालीब भाई यांचे घरापासून ते भाग्यश्री भोजनालया पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीट करणे, या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.27,48,790/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 137 :**

कार्यकारी अभियंता (झोन क्र.4/5/6/7 व 9) यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.35 नारेगाव अंतर्गत आनंद गाडे नगर झिनेबाई यांच्या घरापासून ते अण्णाभाऊ साठे चौक ते जुबेदा शेख नबी यांच्या घरापर्यंत ट्रिमिक्स कॉंक्रीट रस्ता तयार करणे, या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-16 च्या दरसुची नुसार रक्कम रू.27,20,997/- चे तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च मनपा अर्थसंकल्प सन 2016-17 मधील नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षा मधुन करण्यात येणार आहे. सदर अंदाजपत्रकास दिनांक 13/01/2017 रोजी मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे.

तरी वार्ड क्र.35 नारेगाव अंतर्गत आनंद गाडे नगर झिनेबाई यांच्या घरापासून ते अण्णाभाऊ साठे चौक ते जुबेदा शेख नबी यांच्या घरापर्यंत ट्रिमिक्स कॉंक्रीट रस्ता तयार करणे, र.रू.27,20,997/- चे अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.35 नारेगाव अंतर्गत आनंद गाडे नगर झिनेबाई यांच्या घरापासून ते अण्णाभाऊ साठे चौक ते जुबेदा शेख नबी यांच्या घरापर्यंत ट्रिमिक्स कॉंक्रीट रस्ता तयार करणे, या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.27,20,997/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 138 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.27 यशोधरा कॉलनी येथे विविध ठिकाणी (जकेरीया बाकोदा यांची गल्ली, सिंकदर भाई यांची गल्ली, शकील बाफजल, रहेमान भाई यांची गल्ली, अफसर भाई यांची गल्ली, गुड्डु भाई यांची गल्ली, शब्बीर भाई यांची गल्ली) ट्रिमिक्स कॉंक्रीटींग करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन 2014-15 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.29,83,592/- चे तयार करण्यांत आले आहे. प्रस्तावीत कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन 2016-17 च्या अर्थसंकल्पातील मा.स्थायी समितीने शिफारस केलेले कामे अंतर्गत नविन कॉंक्रीट रस्ते पान क्र.20 अ.क्र.13 वर 30.00 लक्ष तरतुद उपलब्ध आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकात रस्त्यास, M-10 व M-20 (Trimix concrete) इत्यादी बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करणे बाबत शिफारस आहे.

करीता प्रस्तावित कामाचे रक्कम रू.29,83,592/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.27 यशोधरा कॉलनी येथे विविध ठिकाणी (जकेरीया बाकोदा यांची गल्ली, सिंकदर भाई यांची गल्ली, शकील बाफजल, रहेमान भाई यांची गल्ली, अफसर भाई यांची

गल्ली, गुड्डु भाई यांची गल्ली, शब्बीर भाई यांची गल्ली) ट्रिमिक्स कॉंक्रीटींग करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.29,83,592/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 139 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.91, जयभवानीनगर येथील मंदीर जवळील रस्त्याचे कॉंक्रीट करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन 2015-2016 च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रूपये 3126498/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2016-2017 च्या आर्थीक वर्षात नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षामधुन करण्यात येणार आहे. सदर कामास मा.आयुक्त महोदय यांची मंजुरी मिळाली असून मा.स्थायी समिती सभागृहासमोर पाठविणे बाबत आदेशीत केले आहे.

तरी रक्कम रू.3126498/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.91, जयभवानीनगर येथील मंदीर जवळील रस्त्याचे कॉंक्रीट करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 3126498/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 140 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गरवारे स्टेडीयम येथील ऑफीस ब्लॉक, स्टोअर रूम, Indoor Games Hall व शौचालयाची अवस्था नादुरूस्त आढळून आलेली आहे. याशिवाय खेळाडुंना थांबण्यासाठी असलेल्या डॉरमेटरी हॉल अत्यंत नादुरूस्त झालेला आहे. त्यानुसार याची दुरूस्ती व इतर दुरूस्ती करण्याकरीता सा.बां. दरसूची सन 2016-2017 जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.39,92,022/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.39,92,022/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गरवारे स्टेडीयम येथील ऑफीस ब्लॉक, स्टोअर रूम, Indoor Games Hall व शौचालयाची व खेळाडुंना थांबण्यासाठी असलेल्या डॉरमेटरी हॉलची दुरूस्ती व इतर दुरूस्ती करण्याकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.39,92,022/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 141 :**

कार्यकारी अभियंता (झोन क्र.4/5/6/7 व 9) यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.35 नारेगांव अंतर्गत मोहल्ला माणिकनगर गल्ली नं. 03 व लक्ष्मी माता मंदीर या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे, या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-16 च्या दरसुची नुसार रक्कम रू.26,08,869/- चे तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च मनपा अर्थसंकल्प सन 2016-17 मधील वार्ड अंतर्गत विविध विकास कामे करणे या लेखाशिर्षा मधुन करण्यात येणार आहे. सदर अंदाजपत्रकास दिनांक 24/01/2017 रोजी मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे.

तरी वार्ड क्र.35 नारेगांव अंतर्गत मोहल्ला माणिकनगर गल्ली नं.03 व लक्ष्मीमाता मंदीर या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे र.रू.26,08,869/- चे अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.35 नारेगांव अंतर्गत मोहल्ला माणिकनगर गल्ली नं. 03 व लक्ष्मी माता मंदीर या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे, या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.26,08,869/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 142 :**

मा.आयुक्त, महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहे की, पडेगांव गावठाण परिसरातील जलकुंभ भरण्यासाठी असलेल्या 200 मी.मी. व्यासाच्या मुख्य जलवाहीनीवर स्थानिक नागरीकांनी घेतलेल्या सुमारे 375 अवैध नळजोडण्या महानगरपालिकेने दिनांक 30/11/2016 ते 05/12/2016 या कालावधीमध्ये खंडीत केलेल्या आहेत. पडेगांव भागातील जलकुंभाचा वापर सद्यस्थितीत होत नसल्याने जलकुंभ भरणाऱ्या मुख्य जलवाहीनीद्वारे बायपास वितरण केले जाते.

मुख्य जलवाहीनीवरील नळजोडण्या खंडीत केल्यानंतर फिरदोस गार्डन, गुलमोहर कॉलनी भागातील नागरीकांनी शिष्टमंडळासह मनपा कार्यालयात येऊन नव्याने अंतर्गत जलवाहीन्या टाकण्याची मागणी केली आहे. त्याचप्रमाणे अधिकृत नळजोडण्या घेण्याची तयार दर्शविलेली आहे.

मुख्य जलवाहीनीद्वारे होत असलेला पाण्याचा गैरवापर व त्यामुळे इतर भागातील पाणी वितरणावर होणारा परिणाम लक्षात घेता फिरदोस गार्डन या वसाहतीमध्ये 150 व 100 मी.मी. व्यासाची डी.आय.के. 7 जलवाहीनी टाकण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन 2015-16 च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च समांतर जलवाहीनी AOSG या लेखाशिर्षकातुन प्रस्तावित आहे. सदर वसाहत ही अनाधिकृतपणे विकसीत झालेली असून No Network Area मध्ये नविन जलवाहीनी टाकण्याचे अंदाजपत्रक रक्कम रू.29,45,377/- चे मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, फिरदोस गार्डन या वसाहतीमध्ये 150 व 100 मी.मी. व्यासाची डी.आय.के.7 नविन जलवाहीनी टाकण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.29,45,377/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 143 :**

औरंगाबाद महानगरपालिकेने समांतर जलवाहीनी योजना रद्द करण्यासाठी दिनांक 01/10/2016 रोजी कन्सेशनर यांना Termination Notice दिलेली असून औरंगाबाद पाणी पुरवठा योजना ताब्यात घेऊन योजनेचे संचलन, देखभाल-दुरूस्ती महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे. औरंगाबाद महानगरपालिका समांतर जलवाहीनी प्रकरणी औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी लिमीटेड आणि महानगरपालिकेमध्ये असलेल्या वाद प्रकरणी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक 24/10/2016 रोजी महानगरपालिकेच्या बाजुने निर्णय दिल्याने महानगरपालिका करीत असलेल्या पाणी पुरवठा संचलन, देखभाल-दुरूस्ती बाबत शिक्कामोर्तब झाले आहे. परीणामी पाणी पुरवठा विषयक पुढील सर्व कामे पूर्वी प्रमाणेच महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहेत.

सद्यस्थितीत पाणी पुरवठा विभागामध्ये असलेला अपुरा कर्मचारी वर्ग पाहता आऊटसोर्सिंगद्वारे अभियंते व कर्मचारी यांना महानगरपालिकेस पाणी पुरवठा विभागास कायमस्वरूपी व्यवस्था होईपर्यंत अथवा पुढील आदेशापर्यंत कर्मचारी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. वरील परिच्छेदामध्ये नमुद परिस्थिती व पाणी पुरवठा प्राधान्य लक्षात घेता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 53 (3) तसेच 67 (3) (C) परंतुका मधील तरतुदीनुसार प्राप्त अधिकारामध्ये अशा प्रकारच्या अस्थायी नेमणुका करण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुसार आऊटसोर्सिंगद्वारे अभियंते/कर्मचाऱ्यांच्या वेतनपोटी आवश्यक माहे ऑक्टोबर-2016 चा मासिक खर्च र.रू.18,88,097/- ला मंजुरी दिली आहे. करीता मा.स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 143

श्री.राजगौरव वानखेडे :विषय क्रमांक 143 हा अवलोकनार्थ आहे का की, मंजूरीसाठी आहे. सदरील काम कोणत्या एजन्सीला दिलेले आहे. कधी दिलेले आहे.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता (पा/पू): समांतर योजनेला दिनांक 01.10.2016 रोजी टर्मीनेट केल्यानंतर पाणीपुरवठा विभागामध्ये असलेला अपुरा कर्मचारी वर्ग पाहता कंपणीकडील 88 कर्मचारी घेवुन पाणीपूरवठा सुरळीत ठेवलेला आहे. ऑक्टोबर 2016 चा मासिक खर्च आहे.

श्री.गजानन मनगटे :त्यानंतरच्या चार महिन्याचे वेतनबाबतीत काय झाले.

कार्यकारी अभियंता (पा/पू):ऑक्टोबर 2016 संदर्भांत संचिका पाठविण्यात आली होती त्यास मा.आयुक्त यांची कार्योत्तर मान्यता झालेली आहे.

श्री.गजानन मनगटे : सहा महीन्यांचा खर्च किती येणार आहे?

कार्यकारी अभियंता (पा/पू):रूपये 18,88,097/- प्रतिमहिना या प्रमाणे सहा महिन्यांचा खर्च येणार आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :सदरील बाब ही धोरणात्मकबाब आहे. मा.सर्वसाधारण सभेपुढे हा विषय गेल्यानंतर मा.स्थायी समितीपुढे हा विषय आला पाहीजे. ऑक्टोबर महीन्याचेच का करण्यात आले, चार महिन्यांचे काय करणार आहे. महिन्याला मान्यता घेणार आहे का?

कार्यकारी अभियंता (पा/पू):याकरीता निविदा काढण्यात आली होती. चार महिन्याच्या पगारासाठी मान्यता कोणती आहे. एका महिन्यासाठी 67 (3) (c) च्या तरतुदीनुसार मान्यता झाली आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :सहा महिन्यांची मुदतवाढीसाठी एकत्रित प्रस्ताव ठेवायला पाहीजे होता. चार महीन्यांचे मंजूरीचे काय करणार कोणती एजन्सी आहे.

कार्यकारी अभियंता (पा/पू):त्यासही मंजूरी घेण्यात येईल. नूर एजन्सी आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :एवढया कालावधीमध्ये टेंडर निघाले असते.

कार्यकारी अभियंता (पा/पू):टेंडर फॉर्म केलेले आहे. निविदा काढण्यासाठी वेळ लागलेला आहे. त्यासाठी एक महिन्याची मुदतवाढिला मंजूरी घेतलेली आहे. टेंडर प्रक्रीयेला उशीर होत आहे. पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी हा निर्णय घेतलेला आहे.

श्री.अजिम अ. रफीक :माझ्या वार्डातील दोन लाखाचे काम विना टेंडर केलेले नाही.

श्री.विकास ऐडके :प्रस्ताव योग्यरीतीने आलेला नाही. प्रस्ताव सविस्तर सर्वसाधारण सभेकडे जायला पाहीजे, त्यानंतर तो स्थायी समितीपुढे मंजूरीसाठी आला पाहीजे.

श्री.गजानन मनगटे :माझ्या वार्डात दुषित पाणी प्रश्नासाठी मा.उच्च न्यायालयाने गठीत केलेल्या समितीने पाहणी करून तात्काळ इस्टीमेट तयार करून काम करण्यास सांगीतले होते, ते काम अद्यापपर्यंत झालेले नाही. 4.5 लक्षाचे काम 67 मध्ये केले नाही. सदरील काम हे 67 मध्ये कसे केले.

कार्यकारी अभियंता (पा/पू):पाणीपूरवठा चालू ठेवणे गरजेचे होते.

श्री.राजगौरव वानखेडे :चार महिन्यांचा पगार 88 कर्मचारी घेणार नाही का? ठराव सर्वसाधारण सभेमध्ये ठेवुन तो स्थायी समितीपुढे आला पाहीजे होता. प्रशासनाने दिशाभुल केलेली आहे. प्रस्ताव अवलोकनास्तव पाठविलेला आहे. यावर निर्णय काय घ्यायचा. स्थायी समितीने निर्णय काय घ्यायचा.

श्री.गजानन मनगटे :विषय क्रमांक 144 नुसार सविस्तर प्रस्ताव ठेवणे आवश्यक होते. एकाच महिन्याचा प्रस्ताव कसा ठेवला? 70 टक्के कामे हे 67 (3) मध्ये केली जातात.

कार्यकारी अभियंता (पा/पू):निविदा काढल्यानंतर सहा सहा महिने प्रतिसाद मिळालेला नाही.

श्री.गजानन मनगटे :प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात यावा.

श्री.नितीन चित्ते :मा.सभापती आपण सभापती झाल्यापासून मा.आयुक्त महोदय किती वेळेस मा.स्थायी समिती सभेला हजर राहीलेले आहे. एवढे विषयाला, इस्टिमेटला मंजूरी दिली पाहीजे शहराचा विकासाचा प्रश्न आहे. विषय क्रमांक 143 मोठा विषय आहे. मा.सर्वसाधारण सभेला व मा.स्थायी समितीला माहीतीस्तव सादर केलेले आहे. मा.आयुक्त महोदय यांनी त्यांचे प्रतिनिधी म्हणुन श्री.रविंद्र निकम, (उपआयुक्त (प्र)) यांना नेमलेले आहे. या संदर्भांत मा.आयुक्तांनी काही पत्र दिलेले आहे का? की, मा.सभापती यांना कळविले आहे का? एखादी महत्वाची बैठक किंवा मा.मुख्यमंत्री, मा.पालकमंत्री, मंत्र्यांचा दौरा त्या वेळेस समजू शकतो, महत्वाचे विषय आणि ऐवढा मोठे विषय या सभागृहात येतात, त्यावेळेस आपण निर्णय काय घेणार श्री.रविंद्र निकम, हे निर्णय घेण्यास सक्षम आहेत का? विषय 143 बाबत दोन्ही सभागृहाला वेडयात काढले गेलेले आहे. पहिला प्रश्न म्हणजे प्रस्ताव अवलोकनास्तव आहे की, मंजूरीस्तव आहे. दुसरा प्रश्न 67 चा अर्थ सभागृहाला सचिव यांनी समजुन सांगावा. त्या नंतर सभागृहात चर्चा करण्यात येईल.

मा.सभापती :खुलासा करावा.

नगर सचिव :महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 67 (3) (C) जेव्हा जेव्हा या अधिनियमात स्पष्टपणे तसा निर्देश देण्यात आला असेल तेव्हा तेव्हा महानगरपालिकेच्या किंवा स्थायी समितीच्या मान्यतेस किंवा मंजुरीस अधीन राहून, तसेच या अधिनियमान्वये किंवा त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य अधिनियमान्वये घातलेले अन्य सर्व निर्बंध, मर्यादा व शर्ती यास अधीन राहून, या अधिनियमांच्या तरतुदींची व त्या वेळी अमलात असलेल्या ज्या कोणत्याही अन्य अधिनियामन्वये महानगरपालिकेकडे कोणतेही कर्तव्य सोपवले असेल किंवा कोणताही अधिकार प्रदान केला असेल त्या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनासाठी असलेला संपूर्ण कार्यकारी अधिकार आयुक्ताकडे निहित असेल, तसेच त्याने-

अ) या अधिनियमान्वये किंवा त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यान्वये त्याच्याकडे विनिर्देशपूर्वक सोपवलेली सर्व कर्तव्ये पार पाठली पाहिजेत व प्रदान केलेल्या सर्व अधिकारांचा वापर केला पाहिजे.

ब)नगरपालिका सचिव व नगरपालिका मुख्य लेखापरीक्षक व त्यांच्य प्रत्यक्ष हाताखाली काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांच्याव्यतिरिक्त अन्य सर्व नगरपालिका अधिका-यांची व कर्मचा-यांची कर्तव्ये विहित केली पाहिजे, आणि विनियमांस अधीन राहून, उक्त अधिका-यांची व कर्मचा-यांची सेवा, वेतन, विशेषधिकार व भत्ते यासंबंधीचे सर्व प्रश्न निकालात काढले पाहिजेत.

क) कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत, जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा आणीबाणींच्या परिस्थितीमुळे

श्री.नितीन चित्ते :सदरची परिस्थिती ही आणीबाणीची होती का? गेल्या दोन महिन्यांपासून कर्मचारी यांचे पगार नाही 67 अंतर्गत कर्मचारी नेमुन वसुली करून कर्मचारी यांचे पगार करण्यात यावे, मनमानी कारभार आहे, एखाद्या नगरसेवकाने चुकीचे बांधकाम केल्यास वार्डात जावुन धडकतात व अतिक्रमण पाडले जातात. 67 अंतर्गत

पाणीपुरवठा विभागात कामे केलेली आहे ती कशी केली गेली. 88 कर्मचा-यांबाबत आस्थापनेची मंजूरी घेतली होती का? जे कर्मचारी भरलेले आहेत त्यांना कोणते अधिकार दिलेले आहेत. काही समस्या निर्माण झाल्यास त्यास कोण जबाबदार आहे. संबधीतांना कोणते अधिकार आहे आणि कोणत्या अधिकारान्वये कर्मचारी भरलेले आहेत.

मा.सभापती :माहिती देण्यात यावी.

कार्यकारी अभियंता (पा/पू):टास्क फोर्सनुसार पाणीपुरवठा करण्यासाठी 850 कर्मचा-यांची आवश्यकता आहे. 250 कर्मचा-यांवर कामकाज चालू आहे. महासभेसमोर निवेदन केलेले आहे.

मा.सभापती :आस्थापनेची मंजूरी आहे का? 88 कर्मचा-यांना कोणते अधिकार आहेत.

श्री.राजगौरव वानखेडे :इंजिनिअर व इतर कोणती पदे आहेत.

कार्यकारी अभियंता (पा/पू):यामध्ये प्रामुख्याने फिटर, लाईनमन आहेत.

श्री.नितीन चित्ते :तत्कालिन आयुक्त श्री.भापकर यांनी दिनांक 16.10.2015 रोजी 67 (3) च्या संदर्भात परिपत्रक काढले होते. (स.सदस्य सदरील पत्र सभागृहात वाचून दाखवतात.) (सभागृहात स.सदस्य 67 अन्वये झालेल्या एकुण अंदाजे 300 ते 400 कामांची (पेव्हरब्लॉक, खडीकरण, डांबरीकरण करणे) असलेली यादी दाखवतात) परत परत त्या चुका का करण्यात येतात. ज्यावेळी अधिका-यांना 67 ची मंजूरीची आवश्यकता वाटते त्या वेळी सभागृहाकडे प्रस्ताव पाठविले जातात समांतर जावुन 4 महिने झालेले आहे. प्रस्ताव आज अवलोकास्तव येतात का मंजूरीस्तव येतात याची माहीती नाही. पाच कोटीचा टँकरचा विषय का सभागृहात आणलेला नाही. तसेच पाणीपूरवठा विभागात वर्षोनुवर्ष काम करणारे काही अधिकारी व कर्मचारी आहेत, त्यातील काही सेवानिवृत्तीला आलेले आहेत. त्यांची शारीरीक फिटनेस तपासणी केली का? त्यांना स्वेच्छा सेवानिवृत्ती करा. त्या अधिकारी/कर्मचा-यांना 60 ते 70 हजार पगार देण्यापेक्षा तीन खाजगी कर्मचारी काम करतील. सांगण्याचा मुद्दा हा आहे की, महानगरपालिकेची वसुली होत नाही. त्यामुळे 67 अन्वये आऊटसोर्सिंग करून वसुली वाढविण्यात यावी. 67 अन्वयेच काम करायचे असल्यास या सभागृहांची आवश्यकता काय? सदरील विषय महत्वाचा होता दोन्ही सभागृहांची मंजूरीची गरज का नाही वाटली. यामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे याची सखोल चौकशी करण्यात यावी. दोषी अधिका-यांवर कार्यवाही झाली पाहीजे.

श्री.राजगौरव वानखेडे :सदरचा प्रस्ताव अवलोकनास्तव प्रस्ताव पाठविलेला आहे. सहा महिण्यांसाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेकडे धोरणात्मकबाब असल्याने पाठविण्यात यावा. त्या नुसार मा.सर्वसाधारण सभेमध्ये हा प्रस्ताव आणण्यात यावा. एजन्सी फिक्सींगचे विषय आलेले आहे. ज्या ज्या एजन्सींना कामे दिलेली आहेत, पेंडींग कामे आहेत त्याची माहीती सभागृहास सादर करण्यात यावी. त्यानंतर सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात यावा. जुने कामे प्रलंबित ठेवुन पुन्हा नविन कामे त्यांना दिल्यानंतर सदरील कामे प्रलंबित राहतात. याबाबत इत्यंभुत माहिती सखोल चौकशी करून माहिती देण्यात यावी. त्यानंतरच सर्व अंदाजपत्रक मंजूर करावे. सर्व विषय पत्रिकेला स्थगीती देण्यात यावी. विषय क्रमांक 143 प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात यावा.

कार्यकारी अभियंता (पा/पू):प्रस्ताव अवलोकनास्तव ठेवण्यात आलेले आहे.

श्रीमती संगीता वाघुले :मस्कट कंन्स्ट्रक्शन यांना ब्लॅकलीस्ट करणे बाबत मा.आयुक्तांनी सांगीतले होते. तरीही त्यांना पुन्हा कामे कसे देण्यात येतात.

श्री.शेख समीना :एका एका एजन्सी यांना तीन तीन कामे देण्यात आलेली आहेत. सर्व कामे प्रलंबित आहेत.

श्रीमती संगीता वाघुले :ब्लॅकलिस्ट केलेले असतांना पुन्हा काम कसे देण्यात आले.

श्रीमती शेख समीना :मस्कट कंस्ट्रक्शनला ब्लॅकलीस्ट केलेले आहे,रोषनगेट ते बायजीपुराचे काम अपुर्ण अवस्थेत करून ठेवलेले आहे.

श्रीमती मनिषा मुंडे :भुमिगत गटार योजनेतुन नाल्यांमध्ये किती पाइपलाईन टाकलेल्या आहेत, माहीती देण्यात यावी. एन 3 एन 4 येथील नाल्याचे पाणी ड्रेनेजची समस्या आहे. वारंवार मी विनंती करत आहे की, हा प्रश्न सोडावा परंतु दुर्लक्ष केले जाते. मा.सभापती यांनी त्या भागाला भेट देवुन पाहणी करावी. दोन वर्षापासून या समस्येमुळे परेशान आहे. आज पाहणी करावी.

श्री.राजगौरव वानखेडे :आऊटसोर्सिंगचे टेंडरचे काम कुठपर्यंत आलेले आहे.

कार्यकारी अभियंता (पा/पू):कामगार विभागाकडुन सदरील काम होत आहे.

श्रीमती शेख समीना :सर्व एजन्सींची काम झालेली आणि प्रलंबीत अशी माहीती पुढील सभेसमोर ठेवण्यात यावी.

श्रीमती मनिषा मुंडे :माझ्या भागामध्ये कुठेही कामे झालेली नाहीत, वारंवार मी कामांबाबत सभागृहात चर्चा केलेली आहे.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी माहिती देण्यात यावी. स.सदस्यांनी एवढया पोटतिडकीने मुद्दे मांडले आहे, परंतु त्याची गंभीर दखल घेण्यात येत नाही.

कार्यकारी अभियंता (श्री.अ.सिद्दीकी):मुकूंदवाडी मेन सिव्हरचे काम सुरू केलेले आहे. हा भाग तीन लाईनला कनेक्ट करणारा आहे.

श्रीमती मनिषा मुंडे ;कोणतेही काम झालेले नाही.

श्रीमती संगिता वाघुले :स.सदस्या प्रत्येक बैठकीमध्ये ड्रेनेजचा प्रश्न उपस्थित करीत आहे परंतु काम होत नाही.

कार्यकारी अभियंता (श्री.अ.सिद्दीकी) : तीन लाईनला कनेक्ट करणारा आहे. त्या ठिकाणी 60 मीटरचा प्रस्तावित डिपी रोड आहे. जागा उपलब्ध नाही तेथील नागरीकांशी संवाद साधुन (या संबधीची व्हिडीओ शुटींगही करण्यात आलेली आहे) 15 फुट जागेची मागणी केलेली आहे. जे नागरीक affected होत आहे तसेच जे जागेचे मुळ मालक आहे, त्यांना नारेगांव हर्सुल येथे जागा देणेबाबत आश्वासित केलेले आहे.

श्रीमती मनिषा मुंडे :चुकीची माहिती देण्यात आलेली आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :ज्या प्रमाणे टुडलर्सच्या ठिकाणी सर्व पोलीस बंदोबस्त लावुन कार्यवाही केलेली आहे, त्या पध्दतीने या ठिकाणी कार्यवाही करण्यात यावी. सदरील शाळा व्हिआयपी होती म्हणुन तात्काळ कार्यवाही केली गेली का? गेली दोन वर्षापासून नगर रचना विभागाशी समन्वय साधुन काम करणे आवश्यक होते. प्लॅन बनवतांना खाजगी मालमत्ता आहे याचा विचार का केला गेला नाही.

कार्यकारी अभियंता(श्री.अ.सिद्दीकी):जागा महानगरपालिकेची आहे, तसेच ज्या ठिकाणी लाईन टाकायची आहे. ती खाजगी मालमत्ता आहे.

श्रीमती मनिषा मुंडे ;एन-3, एन-4 च्या नाला पुर्णपणे वाहत आहे. त्या ठिकाणी डासांचा, दुर्गंधीचा भयानक त्रास सोसावा लागत आहे.

श्री.कैलास गायकवाड :जागेबाबत लीगली डॉक्युमेंट आहे का? पर्यायी जागा देतांना डबलगेम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

कार्यकारी अभियंता(श्री.अ.सिद्दीकी): मुळ मालक असलेले, लीगली डॉक्युमेंट तपासून कार्यवाही केली जाईल.

श्री.कैलास गायकवाड :त्या जागेवरील अतिक्रमण काढण्याबाबत व भुसंपादनाची कार्यवाहीबाबच चर्चा चालू आहे उद्या पर्यायी जागा दिल्यानंतर मुळ मालक टिडीआर किंवा रोख रक्कमेची मागणी महानगरपालिकेकडे करेल. दरवेळेस ड्रेनेजच्या कामासंदर्भांत चर्चा होती परंतु प्रशासनाला ते काम करायचे नाही. ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही तातडीने केली पाहीजे.

कार्यकारी अभियंता(श्री.अ.सिद्दीकी):12 फुट जागा पाहिजे, मशिनद्वारा पाईप टाकण्याची कार्यवाही करावी लागणार आहे.

मा.सभापती :स.सदस्य श्री.नितीन चित्ते यांनी उपस्थित केलेल्या मुद्यानुसार मा.आयुक्तांनी असे काही पत्र दिलेले आहे का? काही महत्वाचे गंभीर विषय असतात आणि निर्णय घेण्याचे अधिकार आपल्याला (श्री.रविंद्र निकम, उपआयुक्त (प्र))आहे का?

प्र.आयुक्त :मा.आयुक्त यांनी कार्यालयीन आदेश दिनांक 24.10.2016 च्या आदेशानुसार महापालिका अधिनियम 43 च्या तरतुदी अन्वये आयुक्तांच्या वतीने मा.स्थायी समितीत उपस्थित राहण्याचे अधिकार उपआयुक्त (प्र) महानगरपालिका औरंगाबाद यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 69 पुढील आदेशापावेतो प्रदान करण्यात आलेले आहे. सदर आदेशाची प्रत मा.सभापती, स्थायी समिती यांनाही सादर करण्यात आलेली आहे.

श्री.विकास एडके :महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 69 चा खुलासा करण्यात यावा.

श्रीमती मनिषा मुंडे :काम न केल्यास उपोषनास बसणार आहे.

नगर सचिव :महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण तीन 43 (2), महानगरपालिका, स्थायी समिती इत्यादींचे कामकाज बाबत सभागृहास वाचून दाखवतात.

प्र.आयुक्त :मा.स्थायी समितीला निर्णय घेण्याचे संपुर्ण अधिकार आहेत. मा.स्थायी समितीने निर्णय घ्यावा, त्या पध्दतीने प्रशासन कार्यवाही करेल.

श्री.मुकूंद कुलकर्णी :मा.स्थायी समितीमध्ये गेल्या दोन वर्षापासून किती विषय घेतले व त्याची अंमलबजावणी किती झाली याचा विचार करण्यात यावा.

श्री.नितीन चित्ते ;तात्पर्य हे आहे की, पत्र किती कालावधीसाठी दिलेले होते आणि त्याचा नियम काय आहे. मा.आयुक्त महोदय यांना मा.स्थायी समितीपैक्षा अशी कोणती प्रत्येक वेळेस Emergency असती, या मीटींगला न येण्याचे, याचे उत्तर देण्यात यावे.

मा.सभापती :मी स्थायी समती सभापती झालो, तेव्हापासून मा.आयुक्त सभागृहात सभेसाठी आलेले नाहीत. येत नाही, कारण काय ? खुलासा करण्यात यावा.

प्र.आयुक्त :महानगरपालिकेच्या वतीने रोजगार मेळावा आयोजित करण्यात आलेला आहे उद्घाटनासाठी मा.महापौर आणि मा.आयुक्त सकाळी 11.00 वाजता त्या ठिकाणी आहेत.

श्री.विकास एडके :विषय पत्रिका चार दिवसांपुर्वी काढलेली आहे.

मा.सभापती :आज रोजगार मेळावा होता, इतर दिवशी.. स.सदस्या श्रीमती मुंढे यांचे प्रकरणाचा खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियता (श्री.अ.सिद्दीकी):जागा उपलब्ध झाल्यास काम करण्यात येईल.

मा.सभापती :एक वर्ष झालेले आहे, कार्यवाही केव्हा करणार.

श्री.सोहेल शेख :जालना रोडवर कोणती समस्या आहे.

श्रीमती मनिषा मुंडे :सर्व चुकीचे काम केलेले आहे, नाल्याच्या खालुन पाणी वाहते, प्रत्यक्ष पाहणी करावी परिस्थिती लक्षात येईल.

कार्यकारी अभियंता (श्री.अ.सिद्दीकी):स्वत: जावुन प्रत्यक्ष पाहणी करण्यात येईल.जागा उपलब्ध झाल्याबरोबर काम करण्यात येईल.

मा.सभापती :पुर्ण शहराची ही समस्या आहे, खड्डे पडलेले आहेत, त्या भागातील खड्डयांचा त्रास तेथील नागरीकांना आणि नागरीकांचा त्रास नगरसेवकांना होत आहे. लवकरात लवकर शहरातील लाईन टाकण्यात आलेल्या ठिकाणचे खड्डयांची कामे करावे, ड्रेनेज लाईनचे झालेल्या कामांची यादी सादर करण्यात यावी. स.सदस्या श्रीमती मुंढे यांचे काम लवकरात लवकर कसे मार्गी लागेल याबाबत कार्यवाही करण्यात यावी. बैठक झाल्यावर संबधीताच्या वार्डात प्रत्यक्ष जावुन पाहणी करावी.

कार्यकारी अभियंता (श्री.अ.सिद्दीकी):स.सदस्य श्री.सोहेल यांच्या वार्डात काम करण्याच्या सूचना केलेल्या आहेत याची माहीती घेवुन माहिती देण्यात येईल.

मा.सभापती :प्रत्यक्ष जागेवर जावुन पाहणी करावी व माहीती सादर करावी.

श्री.राजगौरव वानखेडे : बी सिव्हर लाईनचे काय झाले.

कार्यकारी अभियंता (श्री.अ.सिद्दीकी):45 टक्के काम झालेले आहे, हॉलीक्रॉस समोरील कामासाठी 12 लक्ष रूपये भरलेले आहे. या कामासाठी पाठपुरावा चालु आहे, अजुनपर्यंत एनओसी मिळालेली नाही, पुर्ण ट्रॅफिक थांबवुन हे काम करावे लागणार आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :माझ्या वार्डामध्ये काम करण्यासाठी फक्त दोन महिने आहे काम करायला, ड्रेनेज आणि रस्त्याची वर्कआर्डर झालेली आहे. ड्रेनेज लाईन जोपर्यंत होत नाही, तो पर्यंत रस्त्यांची कामे करता येत नाही. गेल्या सहा महिन्यांपासून कार्यकारी अभियंता यांच्याशी या संदर्भांत पाठपूरावा चालू आहे, परंतु एक काम होत नाही. मेन सिव्हरलाईनला मी डायरेक्ट लाईन जोडु का? वार्डातील सात हजार नागरीकांना फेस करावे लागते, ती लाईन डायरेक्ट जोडु का? गणेश नगरचे रो हाऊस पुर्ण ड्रेनेजने भरलेले आहे.

मा.सभापती :तात्काळ ही समस्या सोडविण्यात यावी.

कार्यकारी अभियंता (श्री.अ.सिद्दीकी):पीडब्ल्युडीशी पाठपुरावा चालू आहे, प्रत्येक वेळी त्यांचेशी चर्चा केलेली आहे, पोलीस विभागाची परवानगी काढुन ठेवण्यात आलेली आहे. एक आठवडा देण्यात यावा.

श्री.राजगौरव वानखेडे :एक महिन्यापुर्वी मा.आयुक्त, मी व संबधीत विभागाचे अधिकारी यांचेशी चर्चा झाली होती, त्या नंतर काय?

कार्यकारी अभियंता (श्री.अ.सिद्दीकी):पीडब्ल्युडीची एनओसी आल्यावर रात्रंदिवस हे काम करण्यात येईल.

श्री.राजगौरव वानखेडे :ठिक आहे, किती वेळामध्ये हे काम करून देण्यात येणार खुलासा करण्यात यावा, त्या नंतर मी ही लाईन जोडुन घेईल. ताज हॉटेलचा समोरचा भाग आहे, मा.आयुक्तांना दाखवले होते, पाय ठेवण्यास जागा नाही. यास खुप कालावधी झालेला आहे.

मा.सभापती :प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून लवकरात लवकर काम कसे मार्गी लागेल ते पाहवे, स.सदस्य श्री.राजगौरव वानखेडे यांनी उपस्थित केलेल्या मुद्दा गंभिर आहे, पावसाळयात त्या भागात काम करता येणार नाही तेथील परिस्थिती गंभिर होईल, यास जबाबदार आपण राहल, येणा-या आठवडयात प्रश्न कसा मार्गी लागेल याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

श्री.राजगौरव वानखेडे :मला टाईमलिमीट देण्यात यावी, नसता डायरेक्ट लाईन जोडुन घेण्यात येईल. त्यानंतर लाईन failuare झाल्यास त्याची जबाबदारी प्रशासनाची राहील. माझी जबाबदारी राहणार नाही, किती वेळात काम होणार,

कार्यकारी अभियंता (श्री.अ.सिद्दीकी):मोठे काम आहे, पाठपुरावा चालू आहे. एनओसी आल्यानंतर रात्रंदिवस काम करण्यात येणार आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :20 मार्चपर्यंत काम करण्यात यावे, 21 मार्चपासून मी काम करणार, संयम ठेवलेला आहे.

कार्यकारी अभियंता (श्री.अ.सिद्दीकी):प्रत्येक स.सदस्यांनी या स्कीमला पाठींबा दिलेला आहे. सहकार्य केलेले आहे, रेल्वे विभागाच्या सिकंदराबादला पाठविलेले आहे, दुस-या विभागाशी संबधीत प्रश्न असल्याने वेळ लागत आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :21 मार्चला लाईनची जोडणी केली जाईल.

कार्यकारी अभियंता (श्री.अ.सिद्दीकी):एक महिन्याचा वेळ देण्यात यावा.

मा.सभापती :काही प्रश्न निर्माण झाल्यास याची जबाबदारी आपली राहील.

श्रीमती संगीता वाघुले :माझ्या वार्डातील ड्रेनेज लाईनची जोडणी केली आहे, त्याची पहाणी कार्यकारी अभियंता यांनी कधी केलेली आहे का? त्या भागातील वार्ड अभियंता यांना फोन केला असता तेही फोन उचलत नाही.

श्रीमती किर्ती शिंदे :भुमिगत गटार योजनेची स्थिती समांतर सारखी होवु नये म्हणुन भुमिगत गटार योजनेसाठी स्थायी समिती तर्फे एक विशेष सभा आयोजित करण्यात यावी. प्रत्येक वार्डात काही ना काही त्रुटी आहे, कामे अर्धवट झालेली आहेत.

श्री.राजगौरव वानखेडे :या योजनेचे ऑडीट रिपोर्ट संदर्भात आदेशित केले होते, तो अहवाल सादर करण्यात यावा.

श्रीमती शेख समीना :विद्युत विभागाचा ऑडीट रिपोर्ट आलेला आहे, तो पुढील सभेत सादर करावा.

मा.सभापती :विषय क्रमांक 143 संदर्भात स.सदस्यांनी गांर्भियाने चर्चा झालेली आहे, हा विषय चुकीचा आहे, येणा-या बैठकीमध्ये हा विषय सोईस्कर प्रस्ताव स्थायी समितीमध्ये आणण्यात यावा. स.सदस्यांच्या म्हणण्यानुसार एक एजन्सी अनेक कामे घेतात वार्डातील कामे करत नाही, त्यामुळे ती कामे प्रलंबित राहतात कामे होत नाही, नागरीकांच्या रोषास नगरसेवकांना सामोरे जावे लागते, कोणत्या कोणत्या एजन्सींनी किती कामे घेतली, कोणती प्रलंबीत आहे, कामाची स्थिती सद्य स्थितीत काय आहे, याची विस्तुत माहिती स्थायी समितीपुढे ठेवण्यात यावी, तो पर्यंत ही स्थायी समितीची बैठक तहकूब करण्यात येते, महत्वाचा, गंभीर, ईमरजन्सींचा विषय असल्यास, महत्वाच्या बैठक असल्यास, पालकमंत्री, मंत्री आल्यास त्यावेळी समस्या नाही, विषय क्रमांक 143 संदर्भात निर्णय घेण्याचा अधिकार उपआयुक्त (प्र) जे की, आयुक्त म्हणुन प्राधिकृत आहे त्यांना नाहीत. स्थायी समितीची विषय पत्रिका चार दिवसांपुर्वीच वितरीत होत असते, येणा-या बैठकीत मा.आयुक्त यांनी स्वतः उपस्थित राहावे, एजन्सी टेंडरच्या कामाचा अहवाल तसेच विषय क्रमांक 143 बाबतचा सविस्तर अहवाल येणा-या बैठकीत देण्यात यावा. आजची सभा तहकूब करण्यात येते.

याच बरोबर मा.सभापती यांनी सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद